# पेत्राचे दुसरे पत्र

2 Peter | with Study Notes

# पेत्राचे दुसरे पत्र

## 1

1 [*]शिमोन[*] पेत्रातर्फे जो येशू मशीहांद्वारे पाठविला गेलेला प्रेषित व सेवक[*] आहे, त्या लोकांच्या नांवें ज्या सर्वांनी आमचा परमेश्वर
व मुक्तीदाता येशू मशीहा यांच्या विश्वासयोग्यतेद्वारे आमच्यासारखाच मोलवान[*] विश्वास[*] मिळविला आहे. 2 [*]परमेश्वर व येशू
ख्रिस्तांना ओळखून घेतल्यामुळे तुमच्यांठायी अपरंपार कृपा व शांति वाढत राह़ो. 3 आम्हांला जीवनासाठी व पवित्रतेसाठी (उचित
जीवन[*]) ज्या सर्वांची आवश्यकता आहे, त्या सर्व गोष्टीं परमेश्वरी सामथ्र्याने[*] (आम्हांला) दिलेल्या आहेत. ज्याने आम्हांला त्याच्या
महिमेसाठी[*] आणि भलेपणाच्या (चांगुल्याच्या) सद्‌गुणांसाठ़ी बोलाविले[*] आहे, ते त्याने त्याच्या ज्ञानाद्वारेच आम्हांस दिले आहे.
4 [*]ते अशासाठी की या अतिमहान व बहुमूल्य प्रतिज्ञांद्वारे[*] तुम्ही, या दुनियेत आढळणाऱ्या वाईट[*] व दुष्टाईच्या इच्छांमुळे[*] उत्पन्न

---

[*]**1:1** 1 पेत्र 1:1.

[*]*“शिमोन”*- मत्त 4:18; 10:2

[*]*“सेवक”*- रोम 1:1.लक्ष द्या की पेत्र प्रभु येशूंस 'आमचा परमेश्वर (याहवे) व येशू मशीहा मुक्तीदाता' असे म्हणतो. ग्रीक अनुवादानुसार हाच अत्यंत समर्पक व सटीक शब्दश: अर्थ आहे जो येशू ख्रिस्तांचे परमेश्वरत्व (सृष्टीकर्ता) दर्शवितो. वचन 11 मध्ये ग्रीक अनुवाद अगदी अशासारखाच केलेला आहे - 'आमचा परमेश्वर व मुक्तिदाता येशू मशीहा'- पाहा तीताला 2:13; फिलि 2:6; इब्री 1:3,8,10; योहान 20:28.

[*]*“मोलवान”*- विश्वास खरोखरीच महान मोलाचा आहे - 1 पेत्र 1:7.जे विश्वास करतात त्यांना तो ‘मिळतो’ किंवा त्यांनी तो ‘मिळविला आहे’ दुसऱ्या शब्दांत: येशूंवरचा विश्वास हा परमेश्वराचा उपहार (बक्षिस) आहे - प्रेषि 3:16; इफि 2:8; फिलि 1:29.

[*]*“मोलवान विश्वास”*- रोम 3:20-26.

[*]**1:2** रोम 1:7.

*“वाढत राहो”*- 1 पेत्र 1:2.लक्ष द्या की विश्वासींमध्ये कृपा व शांति कशी भरभरून वाहू लागते - तुल योहान 17:3.जितके अधिक आपण परमेश्वर बापाला व पुत्राला ओळखत जातो, तितकी जास्त आपली शांति वाढत जाते, त्याबरोबरच आपल्याला परमेश्वराची कृपा हवीहवीशी वाटेल व आपण तिची चाह बाळगू, कृपेविषयी स्तुति करू. परमेश्वराची इच्छा हीच आहे की आपण अधिकाधिक कृपा मिळवून घ्यावी व त्या परमेश्वरी कृपेचा उपयोग, परमेश्वराला आणखी जास्त व पुरेपूर जाणून घेण्यासाठी करावा - इफि 1:17; 3:19; 4:13; फिलि 1:9-10; कल 1:9-12.पौलाने हीच कृपा विश्वासींना मिळावी म्हणून सतत प्रार्थना केली.

[*]**1:3** *“उचित जीवन”*- 1 तीम 2:2; 3:16; 4:8; 6:5-6,11; तीताला 1:1.

[*]*“परमेश्वरी सामथ्र्याने”*- सरळ संकेत प्रभु येशू मशीहांच्या शक्तीकडे केलेला आहे. त्यांच्यात परमेश्वराचे अलौकिक सामर्थ्य आहे, कारण येशू सृष्टीकर्ता आहेत. सच्चे खरे-ख्रिस्ती जीवन, अर्थात परमेश्वराला जसे ते हवे आहे त्यासाठी जे काही आवश्यक असते ते सर्व परमेश्वराने आपल्याला दिलेले आहे. तुल इफि 1:3.बुद्धि, ज्ञान, शक्ति, पवित्रता, ताकद या सगळया गोष्टी येशूंठायीच आहेत व येशू स्वत: हरेक विश्वासी ख्रिस्तीमध्ये आहेत (वास करतात). पाहा - रोम 8:9-10; 2 करिं 13:5; कल 1:27; 2:3.

[*]*“महिमेसाठी”*- योहान 1:14; 17:5.

*“सद्‌गुणांसाठी”*- ग्रीक शब्दाचा अनुवाद स्तुति असा आहे जो 1 पेत्र 2:9यांत दिलेला आहे. त्याचा अर्थ अतिउत्तम गुण (सद्‌गुण), असे चांगुल्य जे खरोखरीच स्तुतियोग्य आहे, ज्यांत सर्वोत्कृष्ट सद्‌गुणांचा समावेश आहे. परमेश्वर चांगला आहे, याहवेचे चरित्र प्रशंसनीय व महिमायोग्य आहे - निर्ग 33:19; नहेम्या 9:25; स्तो 17:13; 31:19; 145:7; 1 पेत्र 2:3.

[*]*“बोलाविले”*- 1 पेत्र 1:15; 2:9,21; 3:9; 5:10;नोट्‌स - रोम 1:6; 8:30.

[*]*“प्रतिज्ञांद्वारे"* - आपण त्या शोधून काढाव्या, त्यांच्यावर विश्वास ठेवावा त्यांचे मनन (विचार) करावे, जे काही परमेश्वर देण्याची प्रतिज्ञा करतो ते सर्व मिळवून घेण्याचा सतत प्रयत्न करत राहावे. तसे न केल्यामुळे जे अनुभव आपण घ्यावे असे परमेश्वराला वाटते (इच्छा) ते परिणाम व ते अनुभव आपल्या जीवनात, आशीर्वाद म्हणून आपण मिळवू शकणार नाही. परमेश्वराच्या वचनांवरच्या विश्वासाने व त्याने केलेल्या प्रतिज्ञांच्या साहाय्यानेच आपण अपराध व अपराधी वृत्तीवर जय मिळवीत असतो. इतकेच नव्हे तर सैतान व दुनियेच्या गोष्टी आपल्या पायांखाली तुडवितो, केवळ विश्वासानेच आपण येशूंबरोबर चालतो व त्यांची सेवा करतो.

[*]**1:4** *“या...प्रतिज्ञांद्वारे”*- संपूर्ण नवा करार (बायबलचा दुसरा भाग) आणि संपूर्ण बायबल या अतिमहान व बहुमूल्य प्रतिज्ञांनी भरलेला आहे.

होणाऱ्या कुजकेपणापासून राखले.* व जपले जावे आणि परमेश्वरी स्वभावाचे हिस्सेदार (भागीदार) व्हावे.*. [5] **याबरोबरच तुम्ही प्रयत्न करा, व विश्वासात.* उत्तम.* वर्तणूक, व उत्तम चालचलणुकीठायी समज.*, [6] आणि समजांसह (ज्ञान) संयम.*, संयमाने (ठायी) धीर.*, धीराने भक्त.ि, [7] भक्तीमध्ये भाऊबंदकीचे प्रेम.*.* वृद्धींगत करत (वाढवा) जावे. [8] या बाबीं (सद्‌गुण) जर तुमच्यामध्ये कायम राहून त्याबरोबरच विपुलतेने वाढत्या राहिल्या.* ,तर तुम्ही येशू मशीहांना ओळखण्याबाबत निष्क्रिय,बेकार व प्रभावहीन

---

* *"वाईट"*- उत्प 6:11-12; स्तो 14:3; यश 1:4; प्रेषि 2:40; इफि 4:22.

* *"वाईट ...इच्छांमुळे"*- जगात जी कोणती दुष्टाई, अनैतिक कृत्यें व व्यभिचार आढळतो, त्याचे प्रमुख मूळ मनुष्याचे मन आहे. पाहा, याकोब 1:14-15; 4:1-2.आपण सर्वांनी पेत्राने दिलेल्या महान प्रोत्साहनाची आज्ञा पाळली पाहिजे, जी त्याने 1 पेत्र 1:14 व 1 पेत्र 2:11यात लिहिली आहे. रचनाकाराच्या थोर व मोलवान प्रतिज्ञा, आपल्यासाठी भ्रष्टाचारापासून निसटण्याचा व वाचून निभावण्याचा एक सुरक्षित मार्ग तयार करतात. चला त्यांचा वापर करा.

* *"राखले"*- जगात असणाऱ्या प्रत्येक भ्रष्टाचाराचे मूळ आहे 'मनुष्याचे मन.' जर आपण जगिक भ्रष्टाचारापासून व अनीतीपासून दूर जाऊन बचाव केला नाही, तर आपण त्यामुळे येणाऱ्या परमेश्वरी क्रोधापासून कधीच राखले (बचाव) जाणार नाही - मत्त 23:33; रोम 2:3; 1 थेस्स 5:3; 2 तीम 2:26; इब्री 2:3; 12:25आणि परमेश्वराच्या प्रतिज्ञांवर पूर्ण भरंवसा ठेविल्यानंतरच आपण सुटूं शकतो.

* *"परमेश्वरी...व्हावे"*- येशूंचे विश्वासी परमेश्वर होतात असे मुळीच नाहीये. किती अशक्य बाब आहे ही? एखाद्या मनुष्याने परमेश्वर व्हावे? निर्माण केलेल्या (परमेश्वराने) कोणत्याही मानवासाठी तसे होणे केवळ असंभव होय. परंतु विश्वासीं येशूंशी जुळलेले आहेत. दोन्हीं एकजीव झाले आहेत; येशू त्यांच्यात व विश्वासीं येशूंत आहेत, परमेश्वराचा आत्मा त्यांच्याठायी आहे - योहान 14:17; 17:20-23.या प्रकारे (दृष्टिने) विश्वासीं दैवीक स्वभाव बाळगतात. विश्वासीं या दृष्टिकोनातून परमेश्वरी स्वभावामध्ये सहभागी आहेत.

* **1:5-7** - परमेश्वराने मशीहांठायी आपल्याला सर्व आवश्यक ते दिलेले आहे, मग जे काही त्याने देऊ केलेच ते घट्ट पकडून ठेवूं या, व ख्रिस्ती जीवनासंबंधी सर्व सद्‌गुणांमध्ये वाढत जाण्याचा कसून प्रयत्न करुं या. आपण विश्वासात, उत्तम वागणुकीत, समज व संयम राखून धीर, भक्ति व सरतेशेवटी भाऊबंदकीच्या प्रेमात वाढतच जावे.

* **1:5** आत्मिक जीवन वाढवितांना या सर्वांचा त्यांत एकत्र समावेश करण्याची जवाबदारी विश्वासींची आहे; परन्तु ते आपण जोडू शकू? आत्मपरीक्षण, प्रार्थना, मनन-चिंतन, परमेश्वराच्या वचनांच्या साहाय्याने, या सर्व दृष्टिकोनांतून सतत प्रयत्न करत राहणे व त्याचा सराव (प्रॅक्टिस) आपल्या जीवनांत केल्यानेच ते शक्य होईल. सोप्या शब्दांत येशूंना परिधान (घालणे) करणे होय, व त्यांनी दिलेला नवीन स्वभाव जोपासणे देखील आलेच -स्तो 1:1-3; लूक 11:28; रोम 13:14; 2 करिं 5:7; इफि 4:22-24.

* *"विश्वासात"*- हीच ती जागा (स्थान) जेथून आपण प्रारंभ करावयाचा आहे. अर्थातच त्यावांचून आपण वर्तनांत सच्चे-खरे 'ख्रिस्त-शिष्य' नसूच मुळी. विश्वास सोडून (वगळून) इतर सर्व सद्‌गुणें जोडली, तरीही त्यामुळे लाभ काहीच होणार नाहीये - स्थायी लाभ, शाश्वत फायदा, नाहीच नाही - इब्री 11:6; योहान 3:36.

* *"सद्‌गुण"*- वचन 3. ग्रीक शब्द असे अर्थ सुचवितो: अतिउत्कृष्ट, उच्च स्तरीय चरित्र, नीतिमत्व, न्याय्य व चांगली वागणूक-शैली.

* *"समज"*- वचन 2. हे चांगुल्य एकदाच नेहमीसाठी जोडले जात नसते. विश्वासींनी निरंतर त्यात वाढण्याची गरज आहे - 3:18; फिलि 3:10 -चला तर, आपण याची सुरवात तर करुं शकतो ना?

* **1:6** *"संयम"*- संयम परमेश्वराच्या आत्म्याचे फळ होय - गल 5:23.पूर्णत: शरण जाऊन पवित्र आत्म्याप्रत समर्पित झाल्यावरच हे चांगुल्य आपण जीवनात जोडतो. त्यानंतर मग पुढच्या जीवनात आत्म्याठायी चालत राहणे, आणि जी समज व शहाणपण परमेश्वराचा आत्मा देत जातो (असतो) त्याचा उपयोग व्यवस्थित व पद्धतशीरपणे, आपले विचार अभिलाषा व कृति (कार्य) यांना आपल्या काबूत (ताब्यात) ठेवण्यासाठी वापरणे हाच यशस्वी मार्ग आहे.

* *"धीर"*- याचा अर्थ असा: कशीही समस्या व परीक्षा (पारख) असली तरीपण त्यांना तोंड देत जाणे, न कचरतां, विश्वास घट्ट बाळगून पुढे निघून जाणे हा होय. प्रियांनों, नैसर्गिक स्वभावानुसार धीर आपल्यामध्ये असतोच असे नाही, कारण तो बहुधा नसतोच. पण हळूहळू तो आपल्या स्वभावात व जीवनात आपल्यालाच जोडावा लागतो, धीराचा समावेश ख्रिस्ती जीवन जगतांना आपणाठायी होऊ द्यावा लागतो - याकोब 1:2-4,12.

*"भक्ति"*- वचन 3;3:11. परमेश्वराप्रत समर्पण-भाव असणे. या पवित्रतेमुळे, आपले मन स्वर्गीक बापासाठी प्रेमास क्रियाशील (कार्यरूप) करते

* **1:7** *"भाऊबंदकीचे प्रेम"*- रोम 12:10; 1 थेस्स 4:9; इब्री 13:1; 1 पेत्र 1:22.यांत वर्णन केलेली पद्धत हेच सिद्ध करते की इतर विश्वासी भाऊबहिणींबरोबर प्रेमभाव-प्रेमसंबंध कशा रीतिने कृति (कार्य) व साजुक प्रेमाच्या भावनेने व्यक्त केलेले असावे.

* *"प्रेम"*- स्वर्गीक - परमेश्वरी प्रेम जे परमेश्वर आपल्या विश्वासी लोकांच्या हृदयात घालतो (ठेवतो) - 'अगापे' - नोट्स 1 करिं 13:1.

* **1:8** *"वाढत्या राहिल्या"*- 3:18; गल 5:22-23; इफि 4:12-15; फिलि 3:12-14.

(अपरिणामकारक) होणार नाही*. 9 परंतु ज्या मनुष्यात या गोष्टी (गुण) नाहीयेत असा मनुष्य अंधुक रीतिने पाहणारा आहे*, नव्हे तो
आंधळाच आहे आणि दूरच्या गोष्टी पाहू शकत नाही म्हणून पुढे येणाऱ्या गोष्टी तो समजू शकत नाही, व त्याचे जुने गुन्हें क्षमा
झालेलेच आहेत याचा देखील त्याला विसर पडला आहे*. 10 यास्तव भाऊबहिणींनों, आपले पाचारण (बोलाविणे जाणे) व निवडिले
जाणे*, निश्चित (खात्रीचे) करण्याचा प्रयत्न करा, कारण जर तुम्ही या सगळया गोष्टी सतत करत राहिला तर कधीही पडणार
(अडखळणार) नाही*. 11 हीच एकमेव पद्धत (तऱ्हा) आहे जिच्यायोगे , तुम्हांला मुक्तीदाता येशू ख्रिस्तांच्या अनंत राज्यांत* शानदार
(सहजसुंदर) दाखला मिळेल. 12 जरी तुम्हांला व दुसऱ्यांनाही, हा सच्चेपणा व्यवस्थित (नीट) शिकविला गेला आहे*, तरीही मी या
सर्व गोष्टींची आठवण* करून देण्याविषयी कशा प्रकारचीही बेपर्वाई (बेफिकीर) करू इच्छित नाही. 13 जोवर मी या दुनियेत* आहे,
तोवर तुम्हांला स्मरण करून उत्साह देऊ इच्छितों, आणि तसे करणे अगदी बरोबर देखील आहे. 14 *ज्या प्रकारे प्रभु मशीहांनी मला

---

*"*निष्क्रिय...नाही*"- खचितच आपल्यातील कोणालाच बेकार- फालतू, कुचकामाचा, निष्क्रिय व प्रभावहीन होणे (राहाणे) आवडणार नाही; परंतु एक बाब नीट लक्षात असू द्या की जर आपण हे संगळे चांगुल्य-सद्गुण, ख्रिस्ती जीवनात जोडले नाहीत तर आपले जीवन हे असेच सडके-कुजके-मेलेले असेल यांत शंकाच नाही.

***1:9** "*असा मनुष्य...पाहाणारा आहे*"- मनुष्य आंधळा आहे, अर्थात या अर्थाने की जर त्याचे जीवन या गुणधर्मांनी भरलेले नसेल, तेव्हा उघडया डोळयांनी त्याला जे दिसू शकले असते तो "आतंरिक सच्चेपणा, अनेक आत्मिक सत्य, कितीतरी अद्भुत गोष्टी" पाहू शकणार नाही. इफि 1:18-19यांत पौलाने केलेल्या प्रार्थनेकडे बारीक लक्ष द्या. जे लोक खूप दूरवरचे पाहू शकत नाहीत, ते पूर्णत: किंवा शब्दश: आंधळे नसतात. त्यांना त्यांच्या अवतीभवती घडणाऱ्या जगिक गोष्टी नीट दिसत असतात, परंतु, त्यांच्यात त्या दृष्टीची उणीव असते जिच्याविषयी पौल 2 करिं 4:18यांत सांगतो.

*"*विसर पडला आहे*"- "अपराधी जीवन जगणे, अपराधांचा मार्ग अनुसरणे" हे त्याला ठाऊक असते, आणि हे देखील की -अपराधांपासून क्षमा मिळविणे, धुतले जाणे म्हणजे काय आहे; सर्वांत महत्वाचे म्हणजे अपराध क्षमा झाल्याचे विश्वासीच्या स्मृतीत (स्मरण) असावे, तेव्हाच त्याला व्यवस्थित कळेल असते वे पक्की खात्री राहिली असती, की परमेश्वराने त्याला चतुर्थ श्रेणीचे नव्हे, तर अतिउच्चस्तराचे व पवित्र जीवन जगण्यासाठी बोलविलेले आहे, व मग त्याने चांगले गुण जीवनात जोडण्याची धडपड व खटपट केली असती - वचनें 5-7.

***1:10** "*आपले...निवडिले जाणे*"- पेत्राचा आशय अगदी स्पष्ट आहे. तो विश्वासीं भाऊबहिणींना समजावून सांगतो की परमेश्वराने केलेले पाचारण व निवड यांचा त्यांना विसर पडता कामा नये, तो पुढे त्यांना बजावितो की त्यांनी याविषयीची निश्चिती करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे, आपले पवित्र पाचारण व त्याकरता झालेली निवड यांचे स्मरण खात्रीपूर्वक असल्यामुळे विश्वासी पवित्र जीवन जगण्यात यशस्वी ठरतो. ज्या अर्थाने 'निवडणूक (निवड)' या शब्दाचा उपयोग बायबलमध्ये झालेला आहे त्यानुसार विश्वासी केवळ एकाच मताने (वोट) निवडला जातो व ते एक मत, परमेश्वराचे असते. हे मत परमेश्वराने दुनियेच्या निर्मितीपूर्वीच दिलेले होते - इफि 1:4; 1 पेत्र 1:2. नोट्स - योहान 6:37; रोम 1:6; 8:28-30; इफि 1:4-6.परंतु, कसे कळेल की स्वर्गीक बापाने आपली निवड केलेली आहे? एक मार्ग हा आहे, की वचनें 5-7 यांत दिलेल्या सर्व कल्याणकृत्यांचा समावेश आपल्या जीवनांत करणे हा होय. जगत असतांना जीवनांत ती जोडत जाणे आणि जर असा प्रयत्न आपण करण्याचे कष्ट घेत नसू, तर आपल्यालाच शंका येईल की परमेश्वराने दिलेल्या तारणाविषयी आपल्याला माहीत तरी आहे की नाही?

*"*पडणार...नाही*"- जीवनात हे गुण समाविष्ट झाले की आपल्याला आणखी अधिक खात्री होत जाते, की परमेश्वराने खरोखरीच आपल्याला निवडले आहे, त्यापुढे मग परमेश्वरावरचा आपला भरंवसा वाढतो, आणि विश्वासात दृढ उभे राहण्याची ताकद देखील वाढते

***1:11** "*अनंत राज्यांत*"- मत्त 4:17; 5:3,10; 6:10,33; 7:21; 25:34; 1 थेस्स 2:12; 2 तीम 4:1,18; इब्री 12:28.वचनें 5-7 यांतील वैशिष्ट्यें (गुण) ज्या विश्वासींनी त्यांच्या ख्रिस्ती जीवनांत जोडली आहेत, अशा सर्वांचे सन्माननीय व भव्य स्वागत स्वत: येशूंच करतील. पण जे अपयशी ठरले आहेत, अशांसाठी ते नसेल - तुल मत्त 5:19; 2 करिं 5:10; प्रकटी 22:12.

*"*व्यवस्थित...आहे*"- कल 1:23; लूक 21:19; 1 करिं 16:13; 2 करिं 1:21,24.

***1:12** "*आठवण*"- रोम 15:15; 1 करिं 15:1; 2 तीम 1:6; 2:14पाहा, परमेश्वराने जे सत्य प्रगट केले आहे, त्याची स्वत:ला वारंवार आठवण करून देण्याची विश्वासीला नितांत गरज आहे. आठवणीत असू देणे (स्मरण करीत राहणे) फार अवघड आहे, पण विसरणे फार सहज व सोपे आहे; परंतु विसरण्याची ही शक्यता, खात्रीने अतिशय हानिकारक परिणाम देणारी ठरेल. पाहा अनु 8:1-5.

***1:13** "*दुनियेत*"- किंवा "तंबू"- 2 करिं 5:1,4.

***1:14** दुसऱ्या शब्दांत पेत्राला स्वत:विषयी आभास झाला(अंदाज) होता, की लवकरच तो मरणार आहे - योहान 21:18-19.तुल 2 तीम 4:6त्या वेळी त्याच्या जीवनकाळी येशू ख्रिस्त पुन्हा परत येण्याविषयीची आशा पेत्र करत नव्हता.

दाखविलेले आहे, आणि मला त्याविषयी माहीत सुद्धा आहे, की या दुनियेतून निघून (निरोप देण्याचा) जाण्याचा माझा समय नजीक
आलेलाच आहे. 15 त्याबरोबरच मला मनोमन असे हवे (इच्छा) आहे*, की माझी येथील जिंदगी संपल्यानंतर देखील, तुम्ही या
गोष्टींची आठवण करावी. 16 आम्ही* तुम्हांला परमेश्वर प्रभु येशू ख्रिस्तांचे सामर्थ्य व त्यांच्या आगमनाविषयीची (येणे) जी खबरबात
सांगितली, ती काही चलाखीने तयार केलेली एखादी काल्पनिक व खोटी कहाणी नव्हती*, परंतु आम्ही तर त्यांच्या महिमेच्या
ऐश्वर्याचे* तेज प्रत्यक्ष पाहणारे साक्षीदारच* होतो. 17 *कारण ज्या वेळी अशी आकाशवाणी ऐकली गेली होती की 'हा माझा लाडका
पुत्र आहे, ज्याच्यामुळे मी प्रचंड (बहुतच) आनंदित आहे,' त्या वेळी या कारणामुळेच येशूंनी परमेश्वर पित्याकडून आदर व ‘महान
नाम’ मिळविले होते. 18 *जेव्हा आम्ही त्याच डोंगरावर त्यांच्याबरोबर होतो, तेव्हा आम्ही हा आवाज (वाणी) पवित्र* डोंगरावरून
ऐकला होता, 19 आणि ही भविष्यवाणी* अशी आहे जणू काही निबीड अंधारांत* एखाद्या रोशनीचे* चमकणे आहे, आणि होय जोवर
येशू मशीहा परत येत नाहीत व त्यांचा तेज-प्रकाश* (रोशनी) आमच्या हृदयांत चमकत नाही तोवर तो कायम असेल. 20 या सगळ्या
गोष्टींपेक्षा, एक गोष्ट प्रथम नीटशी जाणून घ्या, की बायबलमध्ये* आढळणारी कोणतीही भविष्यवाणी, संदेष्टयांची स्वतःची विचार

---

***1:15*** *“मला...आहे”*- त्या वेळी तो कदाचित आपली इच्छा आंशिक रीतिने पूर्ण करण्याचा प्रयत्न करत होता, परंतु असे वाटते की त्या बाबींविषयी तो पुढे त्यांना कधीतरी सविस्तर लिहून पाठवणार होता.

***1:16*** *“आम्ही”*- म्हणजे पेत्र स्वत: व इतर प्रेषित हे सगळे जण येशूंच्या संपूर्ण सेवाकाळी त्यांच्याबरोबरच होते, आणि त्या सर्वांनी अनेक प्रसंगी त्यांचे अद्‌भुत स्वर्गीक सामर्थ्य व अलौकिक कृत्यें आपल्या डोळयांनी पाहिली होती.

* *“चलाखीने...नव्हती”*- तुल 2:3; 1 तीम 1:4; 4:7.

* *“महिमेच्या ऐश्वर्याचे”*- योहान 1:14.येथे पेत्र कदाचित एका अत्यंत वैशिष्टपूर्ण घटनेविषयी बोलतो आहे - अर्थात जेव्हा येशूंचे रूपांतर (बदलणे) होऊन ते महिमेच्या ऐश्वर्याने भरून गेले होते - मत्त 17:1-2.

* *“प्रत्यक्ष...साक्षीदारच”*- योहान 15:27; प्रेषि 1:3त्या सर्वांना अचूकपणे अगदी सविस्तर व नीटसे ठाऊक होते की येशूंनी नेमके काय केले व काय म्हटले. शंका किंवा अविश्वासाला तेथे मुळी कोणतीच जागा नव्हती.

***1:17*** - पाहा मत्त 17:5तो आवाज परमेश्वराच्या निवासस्थानातून (स्वर्ग) आला होता.

***1:18*** - मत्त 17:6.पेत्र एखाद्याकडून ऐकलेल्या बातमीचा अहवाल देत नाहीये. कोणीतरी म्हटले व त्याने ऐकिले अशी गोष्ट नव्हतीच. तो त्या वेळी तेथे हजर होता. त्याने त्याच्या डोळयांनी येशूंचे रूप बदलताना पाहिले, त्याने त्याच्या कानांनी स्वर्गातून येणारी वाणी ऐकिली होती. प्रियांनो, हीच ती विश्वसनीय, खरीखुरी घटना व त्याविषयीची ही प्रत्यक्ष साक्ष देणारे 'दर्शक व श्रोते' असे येशूंचे हे मूळचे प्रारंभिक प्रेषित होते; म्हणूनच तर त्यांची साक्ष एवढी जबरदस्त व प्रचंड प्रभाव टाकणारी ठरली. तुल प्रेषि 1:8; 2:32.

* *“पवित्र”*- पाहा, तो डोंगर याकरता ‘पवित्र’ ठरला (झाला) कारण त्या अलौकिक घटनेसाठी परमेश्वराने, तो डोंगर वेगळा केलेला, अर्थात निवडलेला होता. नोट्स लेवी 20:7.

***1:19*** *“भविष्यवाणी”*- म्हणजे पेत्राला जुन्या करारातील पुस्तकांनी दिलेल्या माहितीविषयी बोलावयाचे आहे. नोट्स - उत्प 20:7.त्या भविष्यवाण्यां, 'येशूंचे सामर्थ्य व त्यांच्या द्वितीय आगमनाविषयींच्या होत्या' - वचन 16; स्तो 2:8-9; 96:13; 98:9; यश 2:12-19; 13:9-11; 26:21; 62:11; 63:1-6; दानी 7:13-14; जखऱ्या 14:3-5.येशूंच्या रूप-परिवर्तनामुळे त्या भविष्यवाण्या जुन्या कराराने दुजोरा दिल्यामुळे आणखी जास्त खात्रीपूर्ण (पक्क्या) ठरल्या; येशूंचे विश्वासी त्यामुळे प्रचंड निश्चित (अगदी ठाम) व असे भारावून गेले की त्या भविष्यवाण्या शंभर टक्के पूर्ण होतीलच, होय, त्यांचे घडणे अवश्य होईल. विश्वासींनों संदेष्टयांचा शब्द हा तो प्रकाश (रोशनी) होता जो परमेश्वराने त्याच्या विश्वासींना देऊ केला होता - तुल स्तो 119:105; नीति 6:23.हे प्रकाशन आपल्याला स्पष्ट निर्देश देते व संकेत करते, की आपण कोठे आहोत व कोठे जात आहोत. प्रियांनो न डळमळता, न लटपटता, खाली न पडता व न अडखळता, ख्रिस्ती जीवनाची वाटचाल यशस्वीपणे कायम ठेविण्यात हा प्रकाश आपले मार्गदर्शन व साहाय्य करतो.

* *“निबीड अंधारात”*- स्तो 82:5; नीति 4:19; योहान 1:5; 3:19; रोम 1:21; इफि 4:18; 6:12; 1 योहान 2:11.

* *“रोशनीचे”*- म्हणजे येशू मशीहांच्या दुसऱ्या येण्याची घटना. मग पृथ्वीच्या अपराधांची लांब काळांची रात्र एकदाची संपेल - रोम 13:12; यश 60:1-3.

* *“तेज-प्रकाश”*- प्रकटी 22:16.या वचनात पेत्र आपल्यास विनंती करून, जुन्या करारातील संदेष्टे, याबाबत काय बोलले होते, याचे अध्ययन करण्यावर भर देतो आहे.

***1:20*** *“बायबलमध्ये”*- येथे तो जुन्या कराराचा उल्लेख करतो. जे त्यांनी पहिले होते त्याचा अर्थ त्यांनी स्वत:च्या बुद्धीने सांगितला नाही, आपण देखील त्यांनी काय लिहिले होते, त्याचा अर्थ काय होता कशा प्रकारेच सांगू शकणार नाही. लबाड व खोटे संदेष्टे अगदी याविरुद्ध असतात. ते भविष्यवाणी व त्याचा अर्थ स्वत:च्या मनाने व कल्पना-शक्तीने खोटानाटा सांगत असतात - यिर्म

प्रक्रिया नाहीये. [21] कारण गुदरून गेलेल्या दिवसांत (जुना-काळ) एकही (कोणतीही) भविष्यवाणी मनुष्याच्या इच्छेने झालेली नव्हती.[*], पण परमेश्वरासाठीचे वेगळे केलेले संत व भक्तगण, त्यांना पवित्र आत्म्याने दिलेल्या उभारीनंतरच संदेश देत असत.

## 2

[1] जसे त्या लोकांच्यामध्येही लबाड संदेष्टे.[*] होते, तसेच तुमच्यामध्ये.[*] सुद्धा खोटे शिक्षक होतील, ते मोठ्या चलाखीने.[*] पाखंडी विधानें (गोष्टी) सादर करतील; इतकेच केवळ नव्हे, तर ज्याने विश्वासीं-चर्च विकत घेतले आहे त्या परमेश्वराला ते नाकारतील.[*], या कारणास्तव ते त्यांच्या स्वतःवरच, बहुत लवकर विनाश.[*] (बर्बादी) ओढवून घेतील.[*]. [2] अनेक लोक त्यांची नुकसान पोचविणारी

---

14:14; 23:16; यहे 13:3.बायबलमधील संदेश (भविष्यवाणी) प्रभु परमेश्वरापासून आलेल्या आहेत, म्हणून त्या समजून घेण्यासाठी परमेश्वराचे साहाय्य हवे असते, केवळ परमेश्वरच त्यांचा समर्पक अर्थ सांगू शकतो.

[*]**1:21** *“मनुष्याच्या...नव्हती”*- अर्थातच पेत्र परमेश्वराच्या संदेष्टयांनी मुखांतून बोललेल्या जुन्याकरारातील भविष्यवाणींच्या संदेशांस संबोधित करतो. संदेष्टयांनी स्वत:च्या इच्छेप्रमाणे काय 'बोलावे-लिहावे' हे निश्चित केले नव्हते. त्यांच्या भविष्यवाण्या स्वर्गातून आलेल्या होत्या. तुल यिर्म 1:9.ते मोठ्या सच्चेपणाने व ठामपणे म्हणू शकत होते,'प्रभु-यहोवा' असे “म्हणतो” - यश 1:2,10,11; यिर्म 2:4; यहे 3:16-17;आणि हे फक्त यासाठी की ते शब्दश: खरेच होते. परमेश्वराने त्यांना त्या वेळी त्यासमयानुसार, जे हवे होते नेमके तेच शब्द दिले (मुखांत घातले). परमेश्वराच्या आत्म्याच्या स्वाधीन (हाती) करून, परमेश्वराचे सत्य घोषित करण्यासाठी परमेश्वराच्या एका साधनाच्या (माध्यमाच्या) रूपाने संदेष्टे बोलीत असत. परमेश्वराच्या निर्देशानुसार, त्यांच्या मुखांतून परमेश्वराचे शब्द बाहेर पडत असत - पाहा मत्त 4:4; 5:17-18; मार्क 12:4-6; योहान 10:35; प्रेषि 4:25; 1 करिं 2:13; 2 तीम 3:16; इब्री 1:5-13; 1 पेत्र 1:11. जो कोणी बायबलकडे दुर्लक्ष करतो, तो जिवंत परमेश्वराच्या शब्दाकडे दुर्लक्ष (अपमान) करतो. जर आपण भविष्यवाणीविषयी अजाण व अज्ञानी असू तर याचा अर्थ असा आहे, की या पृथ्वीवर परमेश्वर आणखी पुढे (नंतर) जे काही करेल, त्या सर्व घटना (बाबीं) व अनेक इतर सत्यांविषयी सुद्धा अजाण व अज्ञानी असणार आहोत.

[*]**2:1** *“लबाड संदेष्टे”*- अनु 13:1-5; 18:20-22; 1 राजे 18:19-40; 22:6-7; यश 9:15; यिर्म 2:8; 5:31; 14:14; 28:1-9; यहे 13:2-7.

[*]*“तुमच्यामध्ये”*- मत्त 7:15; 24:11; प्रेषि 20:29-30; रोम 16:17-18; गल 1:7; फिलि 3:18; 1 तीम 4:1-2; 2 तीम 4:3; याकोब 4:1.ही पद्धत जी अतिशय प्रभावीपणे यशस्वी झाली व ती सुद्धा अनेक शताब्दीपासून, ती पद्धत सैतान सहजासहजी (सोप्या रीतिने) सोडणारच नाही. तो स्वत:च या दुनियेतील पृथ्वीवरचा पहिला (प्रथम) लबाड संदेष्टा होता - उत्प 3:4; योहान 8:44.

[*]*“चलाखीने”*- 2 करिं 11:13-15; गल 2:4; यहूदा 4. आपली खोटी शिकवण पुढे मांडण्यापूर्वी जे अतिशय हुशारीने व शहाणपणाने ख्रिस्ती लोकांचा विश्वास संपादन करण्याचा कसून प्रयत्न करतात. मोठ्या चतुराईने खोटयाबरोबर ते सत्य असे काही मिसळतात की खोटी गोष्ट लोकांना जास्त आकर्षक व महत्वाची वाटते. त्यांपैकी बहुतेक पाळक (पास्टर), शिक्षक, प्रोफेसर व बिशप असतात, ज्यांचा स्वीकार चर्चेसने व डिनॉमिनेशन्सने केलेला असतो, त्यांना जणू या चर्चेसची स्विकृतीच मिळालेली असते. स्वत:च्या लबाड शिकवणीने सगळे खोटे-उपदेशक प्रत्येक मनुष्याचा व संपूर्ण चर्चेसचा आत्मा भ्रष्ट-नष्ट करणारे ठरतात - धार्मिक लबाडी भयंकर प्राणांतिक (जीवघेणी) असते. पाहा - उत्प 3:4या सैतानाच्या सर्वप्रथम लबाडीमुळे संपूर्ण मानवजात नाशाच्या खड्डयात ढकलली गेली, त्याचे अनुयायी तेथे अनेक लोकांना ठेवतात.

[*]*“नाकारतील”*- मत्त 20:28; 1 करिं 7:23; गल 3:13; प्रकटी 5:9.दुसऱ्या लोकांसाठी (जगातील) येशूंनी अपराधांपासून त्यांची सुटका करण्यासाठी खंडणी म्हणून स्वत:स अर्पण केले आणि विसरतां कामा नये की या सर्व लोकांमध्ये त्या लबाड संदेष्टयांचा, शिक्षकांचा, पास्टरांचा, प्रोफेसरांचा सुद्धा समावेश होतो - 1 तीम 2:6.येशूंनी खूप मोठी किंमत चुकती केली आहे. जर प्रत्येकाने पश्चात्ताप केला, विश्वास केला व येशूवार्ता स्वीकारली तर त्याचे/तिचे तारण व्हावे, हाच येशूंचा मूळ हेतू होता की नाही? खोटे शिक्षक ख्रिस्तांना सपशेल नाकारतात; याचा अर्थ स्पष्ट स्पष्ट असा होत नाही काय, की ते येशूंचे परमेश्वरत्व स्वीकारीत तर नाहीच पण त्यांनी केलेले बलिदान नाकारून थेट त्यांचा अपमान करतात. तरी स्वत:ला ख्रिस्ती म्हणतात, परंतु त्यांचा हा नकार बहुत खतरनाक, फसवा व गुप्त असू शकतो - तुल रोम 16:18.

[*]*“विनाश”*- चुकीची शिकवण लोकांना व संपूर्ण विश्वासी समूहांसाठी व चर्चेंससाठी नाशाचे कारण ठरते. अनैतिकतेने शिकविलेले नीतिचे शिक्षण विनाशक ठरते. जो कोणी चुकीच्या शिकवणीच्या आहारी जातो व बायबलचे सत्य नाकारतो तो प्रत्येक जण सैतानाच्या विनाश दरीत कोसळतो. जी शिकवण बायबलशी जुळलेली नाहीये तिच्यापासून विश्वासींनों, कृपाकरून दूर राहा.

हानिकारक चालचलणूक (व्यवहार) स्वीकार करतील.[*], आणि त्यांच्यामुळेच सच्चेपणाच्या मार्गाची बदनामी (निंदा) केली जाईल.[*].
3 पाहा, त्यांच्या स्वतःच्या फायद्यासाठी.[*] ते त्यांनी स्वतःच तयार केलेल्या शिकवणीने (पाखंडी मतें).[*] तुम्हां सर्वांना आपल्या
व्यापाराचे साधन.[*] (करतील) म्हणून वापरतील. त्यांचा दंड.[*] बहुत पहिल्यापासून ठरविलेला (नेमून) होताच, व हा दंड त्यांना
अति-शीघ्र मिळेल देखील. 4 [*]कारण जर परमेश्वराने, त्याच्याविरुद्ध बंडाळी करणाऱ्या स्वर्गदूतांची गय (सोडले नाही) केली नाही,
पण नरकांत.[*] टाकून अंधाराच्या साखळदंडांनी बांधले, यासाठी की शेवटल्या (अंतिम) फैसल्यापर्यंत.[*] त्यांनी तेथेच रहावे; 5 [*]आणि
सच्चेपणाचा संदेशवाहक नोहा व सात लोकांवांचून.[*], सगळी विद्रोही पिढी जलप्रलयाने नाश करून ती जुनी-दुनिया देखील सोडली
(गय) नव्हती; 6 [*]जर परमेश्वराने सदोम-गमोराचे नांवनिशाण मिटवून त्यांची राख (भस्म) केली, यासाठी की भविष्यकाळी दुष्टाई
करणाऱ्यांसाठी एक नमूना.[*] द्यावा (मागे ठेवावा), 7 आणि नीतिमान लोटास.[*] सोडवून (सुटका) घेतले, जो घृणित कृत्यें करून

---

[*]*"स्वत:वरच...घेतील"*- फिलि 3:19.खोटे शिक्षक बर्बादीला आमंत्रण देत आहेत. परमेश्वराला ते प्रेरित करत आहेत व चीड आणीत आहेत की त्याने त्यांचा नाश करावा. त्यांची वागणूक, फसवणूक, व धोकेबाजी न्यायाकरता आक्रोश करीत आहे, खरेच त्यांच्यावर न्याय व दंड येणारच. जे काही घडेल त्यासाठी पूर्ण रीतिने ते स्वत:च जबाबदार असतील.

[*]**2:2** *"स्वीकार करतील"*- मत्त 24:11; फिलि 3:18.

[*]*"सच्चेपणाच्या...जाईल"*-जे म्हणतात की आम्ही सत्य-मार्गावर चालत आहोत, पण चालत नसतात, अशा खोट्या लोकांमुळे जे ख्रिस्तांचा मार्ग बदनाम करतात; त्यांना पाहणारे व बारीक अवलोकन करणारे लोक असाच निष्कर्ष काढतात की ख्रिस्तांचा मार्ग खरा नाहीये व त्यात काही दम नाहीये, कारण 'ख्रिस्तांवर विश्वास आहे' असे म्हणणारे हे लोक, मुक्तीवार्तेचा अपमान करतात.

[*]**2:3** *"फायद्यासाठी"*- वचन 15; रोम 16:18; फिलि 3:19; 1 तीम 6:5,10.त्यांची धार्मिक कृत्यें सेवा व वरवरची दिखावटी कामें जी ते ख्रिस्ती समाजासाठी करतात (असे ते म्हणतात), खरे पाहता लोकांच्या कल्याणाची व सामाजिक हितांची नसतात, पण केवळ त्यांच्या स्वत:च्या फायद्यासाठीची व धनलाभासाठीची असतात.

[*]*"शिकवणीने (पाखंडी मतें)"*- 1 तीम 4:1-2,7; 6:20-21; 2 तीम 4:3-4.परमेश्वराच्या वचनांची स्पष्ट शिकवण त्यांच्या आवडीची नसते. सत्य-वचन आवडत नाही म्हणून ते तोडूनमोडून आपल्या नफ्यासाठी, त्यांची स्वत:ची शिकवण लोकांना शिकवतात.

[*]*"व्यापाराचे साधन"*- परमेश्वराच्या विश्वासींची त्यांना काही कदर नसते, फिकर नसते, चर्चविषयी त्यांना काही घेणेदेणे नसते, ते फक्त आपल्या पाखंडी मतांनी, खोट्या शिकवणींनी, सर्वांना स्वत:साठी व्यापाराचे साधन म्हणून वापरतात. त्यांची वागणूक व पैशांचा व्यवहार, अगदी यहूदाप्रमाणे असतो, हे लोक धनासाठी कोणालाही सहज विकतात.

[*]*"दंड"*- परमेश्वराने खूप पूर्वीच त्यांच्या दंडाज्ञेचा प्रबंध केलेला होता; व तो ठरविलेल्या नियत-समयी त्यांच्याशी त्यानुसार व्यवहार करेल.

[*]**2:4** - पेत्राने दिलेल्या तीन उदाहरणांपैकीचे हे पहिले उदाहरण आहे. पेत्र यावरून असे स्पष्ट प्रगट करतो, की परमेश्वर इतका सक्षम व समर्थ आहे, की जो कोणी आज्ञा भंग करून बायबलच्या सत्यानुसार जीवनाचा मार्ग आक्रमीत नाही व सत्याठायी वागत नाही, (नसेल) अशा सर्वांना (अशा एकेकाला) त्याने नेमलेल्या वेळी योग्य दंड द्यावा.

[*]*"नरकांत"*- ग्रीक (मूळ) भाषेत यास 'टार्टरस' असे म्हणतात, ज्यानुसार त्याचा अर्थ आहे दंडाचे स्थान, अंधाराचे साखळदंड - तुल वचन 17; मत्त 25:30.

[*]*"शेवटल्या फैसल्यापर्यंत"*- 1 करिं 6:2-3.

[*]**2:5** उत्प 6:5-8,11-13,18; 7:11-12,23.

[*]*"नोहा व सात लोकांवांचून"*- हे 'एकमेव' स्थान आहे. संपूर्ण बायबलमध्ये जेथे नोहास एक 'संदेशवाहक अर्थात प्रचारक' असे संबोधिले गेले आहे. नोहा एक नीतिमान पुरुष होता, तो परमेश्वर- भिरू होता - उत्प 6:9.त्याने आपल्या समयाच्या लोकांना या विशिष्ट दिवसाविषयीचा संदेश दिला होता, परंतु त्यांनी त्याच्या चेतावणीकडे दुर्लक्ष केले; नव्हे ऐकलेच नाही. त्याची 'संदेशवाहक' म्हणून ही सेवा अनेक वर्षे चालली होती, परंतु एक मनुष्य बदलला नव्हता. जर परमेश्वराने नोहाच्या दिवसांतील अस्तित्वात असलेली मानवजात, दंडाविना सोडली नाही तर तो आत्ताच्या या खोट्या शिक्षकांनाही खात्रीने शिक्षेवांचून सोडणार नाही, याची आपणास शाश्वती असावी. पाहा, अखंड मानवजात नष्ट झाली, नोहाच्या परिवारातील फक्त ते आठ लोकच बचावले (निभावले).

[*]**2:6-8** - उत्प 19:1-29.तर मग लबाड शिक्षक, पास्टर, बिशप, प्रोफेसर हे कसे निभावतील? त्यांची सुटका होणे असंभव आहे.

[*]*"एक नमूना"*- यूह 7; मलाखी 4:1; मत्त 3:10,12; 25:41.

[*]**2:7** *"नीतिमान लोटास"*- उत्प 18:23.या वचनावरून कळते की लोटाचा परमेश्वरावर विश्वास होता व हे सुद्धा स्पष्ट होते की परमेश्वराने त्याला नीतिमान असे जाणले (मोजले) - तुल उत्प 15:6,पण बायबलमध्ये याचे वर्णन किंवा नोंद नाहीये. सदोमात राहताना, लोटाच्या आंतरिक अनुभवांविषयी पेत्राचे शब्द आपल्याला योग्य ती माहिती देतात. लोट नीतिमान का होता हे बघा;

जगणाऱ्यांमुळे अत्यंत परेशान (अस्वस्थ) होता, [8] व तो त्यांच्यामध्ये राहत असताना, जे काही पाहात व ऐकीत असे त्यामुळे बहुत मानसिक पिडेतून जात (पीडित) होता, [9] *तर येशूंना पुरेपूर कळते (जाणीव), की मुक्तीप्राप्त मनुष्याची पारख* होताना (समयी) त्याला कसे सोडवून (सुटका) घ्यावे व दुष्ट व्यक्ती दंड समयांपर्यंत*, अर्थात न्यायाच्या* दिवसापर्यंत कसा राखून ठेवावा; [10] हमखास असे लोक जे अशुद्ध* कृत्यांची निवड करतात व ती करण्याच्या आवडींमुळे गलिच्छ कृत्यें कवटाळतात (चिकटतात) व अधिकार तुच्छ लेखितात*. ते अतिशय घमेडंखोर व हट्टी आहेत आणि अधिकाऱ्यांविरुद्ध बोलावयास (निदंनीय गोष्ट) देखील मागे हटत (कचरत) नाहीत. [11] *जरी स्वर्गदूत अधिकार व सामर्थ्य यांत प्रचंड बलवान असतात तरीही त्या लोकांविरुद्ध, ते परमेश्वरासमोर कसलेही घृणित आरोप ठेवीत नाहीत. [12] *परंतु, हे लोक मात्र काही न समजण्याऱ्या बुद्धीहीन (बिनडोक) जनावरांसारखे* आहेत, जे पकडले जाण्यासाठी व नाश होण्यासाठीच जन्मले आहेत. ज्या गोष्टींची समज (शहाणपणा) यांना नाहीये, (हे लोक) त्याच गोष्टींची निंदा ते करीत असतात, आणि नंतर ते स्वतःच्या विनाशाठायीच मिटून (संपून) जातील. [13] या अशांना त्यांच्या दुष्टाईचे वेतन* (बदला) अवश्य मिळेलच. ते दिवसाच्या प्रकाशात* चैन (मजा लुटणे) करु इच्छितात, ते डाग व कलंक

---

सदोम-गमोरातील लोकांची घृणित कृत्यें व अपराधमय अवस्थेत जगणारे लोक पाहून तो अत्यंत बेचैन व अस्वस्थ होत असे, लोट लोकांचे बोलणे - चालणे पाहून भयंकर मानसिक पिडेतून जात असे. त्या दुनियेची अशी दयनीय अवस्था पाहून तो तळमळत असे म्हणून परमेश्वराने लोटास नीतिमान गणले. पेत्र हीच वास्तविकता दाखवितो की परमेश्वराचे भय राखणाऱ्या व मुक्ति प्राप्त करणाऱ्या व्यक्तीच्या मनांत त्या वेळी काय होते, त्याची काय दशा होते ज्या वेळी तो दुनियेची दुष्टाई पाहात असतो.

*2:9 - जसे आधी होते, तसेच आता सुद्धा आहे. आज देखील मानवजात दोन गटांत विभागलेली आहे - 'परमेश्वरी भय असलेले, उत्तम चरित्राचे लोक' व 'अनीतिचे जीवन जगणारे, वाईट चरित्राचे लोक.' बायबलमध्ये 'परमेश्वरी' लोक ते आहेत, जे एकाच सत्य व जिवंत परमेश्वरावर विश्वास ठेवून त्याप्रत समर्पित असतात. येशू ख्रिस्त परमेश्वराचे प्रतिरूप आहेत, म्हणून नीतिचे पालन करणारे, सच्च्या-प्रभुवर भरंवसा ठेवितात व त्यांनी शिकविल्याप्रमाणे जीवन जगून सत्य-मार्गाचे अनुसरण करतात. अनीतिमान लोक परमेश्वराला नाकारतात; जरी ते म्हणत असतील की त्यांचा त्यांच्यावर विश्वास आहे तरीही, ते एकाच सत्य परमेश्वरास रद्द करतात व त्यांची जीवनशैली प्रगट करते की ते लबाड आहेत व खरोखरीच ते परमेश्वरावर भरंवसा ठेवीत नाहीत.

* *"पारख"*- 1 करिं 10:13; रोम 8:35-39.

* *"दंड समयापर्यंत"*- न्यायदंडाचा तो नियुक्त दिवस आला नसला तरीपण ज्या अनैतिक मनुष्यांनी अपराध करून मनमर्जीप्रमाणे वाट धरली होती, दुष्टाई केली होती, ते मरण पावले असले, तरी आताही त्यांना दंड दिला जात आहे - लूक 16:22-25.विश्वासींनों हा दंड ते आत्ताही सहन करत आहेत व न्यायाच्या दिवसापर्यंत सहन करत राहातील, आणि त्यानंतर देखील.

* *"न्यायाच्या"*- प्रेषि 17:31.

***2:10** *"अशुद्ध"*- मत्त 15:19; रोम 1:24; इफि 4:19,22.

* *"अधिकार...लेखितात"*- अर्थात, जो कोणी त्यांच्यावर अधिकार उपयोगात आणू इच्छितात त्यांचे ऐकावयास - मानावयास ते तयार नसतात मुळी. आणि आज्ञा भंगासह, लोभी वृत्तीची खुरापत व अनैतिक बाबींबरोबर त्यांची दुष्टाई वाढतच जात असते. या दुष्कृत्यांच्या आधीनतेखाली राहणारी माणसें अधिकऱ्यांच्या ताब्यांत राहण्याचे टाळतात, किंबहुना कोणी त्यांच्यावर नियंत्रण ठेवावे (राहावे) हे त्यांना पटत व आवडतही नाही, मग तो अधिकाऱ्यांचा अधिकार असो की परमेश्वराचा, कारण त्यांना कोणाचीही लुडबुड त्यांच्या दुष्ट-कृत्यांत मधेमधे नको असते. येशू ख्रिस्तांचे प्रभूत्व ते नाकारतात. जसजसे (जितके) ते त्यांच्या अनैतिक व दुष्टाईच्या कार्यांत, वाढत जाऊन त्यांच्या भ्रष्ट इच्छा व अभिलाषांमध्ये लिप्त होत जातात, तसतसे (तितके) अधिक ते धीट, बेडर, बे-लगाम, भ्रष्ट व घमेंडी होत जातात. अदृश्य दुनियेविषयी अजाण असलेले अनैतिक व दुष्ट लोक, बेअदबी व तुच्छतेचा भाव राखतात, त्यांच्याविषयी त्यांना तिरस्कार वाटतो. त्यांच्यासाठी फक्त अस्तित्वात असलेली ही दुनियाच सर्व काही आहे.

***2:11** - तुल यहू 9.

***2:12** - इफि 4:18; यहूदा 10. महत्वाच्या कशाविषयी तरी आपण अजाण आहोत ही गोष्ट मानून घेण्यासाठीची नम्रता त्यांच्यात नसते. जे काही त्यांच्या समजापलीकडचे आहे, वे जे त्यांना कळतही नाही, अर्थात अलौकिक सत्याविषयी ते अत्यंत घमेंडीने व मगरूरीने मनांस येईल ते बोलित असतात.

* *"बुद्धीहीन (बिनडोक) जनावरांसारखे"*- स्तो 49:12,20; 57:4; 74:19.बिनडोक प्राण्यांसारखे ज्यांना बुद्धि नसते, त्यांच्यासारखेच हे असतात. त्यांच्यात जनावरांना नसते तशीच आतंरिक-समजाची उणीव असते, ते जनावरांसारखे आतंरिक ज्ञानांत शून्य असतात. त्यांना केवळ शारीरिक इच्छांची पूर्ति करण्याची हवस असते. वादविवाद करण्याची क्षमता आहे असे त्यांना वाटते व त्याचाच घमेंड असतो, परंतु वागणूक अशी असते की जणू त्यांना काहीच ज्ञान नाही ते ज्ञानशून्य आहेत

***2:13** *"दुष्टाईचे वेतन"*- गल 6:7-8; 2 थेस्स 1:6.

आहेत; तुमच्याबरोबर ते जेवतात.* तर खरे, पण तरी (आपल्या) स्वतःच्या धोक्यातच पडून राहण्यांत त्यांना मौज (आनंद होतो)
वाटते. 14 *त्यांचे डोळे व्यभिचाराने भरलेले आहेत व ते गुन्हें करण्यापासून थांबू शकत नाहीत. ते चंचल (अस्थिर) मनाच्या लोकांना
सहज गंडवितात (फसविणे). त्यांचे मन लोभाविषयी.* अभ्यस्त (सवय) झालेले आहे. ते शापग्रस्त लोक आहेत. सरळ-सच्चा मार्ग
सोडून भटकले आहेत. 15 बौराचा मुलगा बलाम.*, ज्याने बेईमानीच्या (अप्रामाणिकतेच्या) लाभांवर प्रेम केले (प्रिय जाणले) होते,
तोच मार्ग त्यांनी अवलंबिला (स्वीकारला) आहे.*. 16 *बलामाशी, गाढव मनुष्याच्या वाणीने बोलले, त्याच्या बंडाळीसाठी त्यावर
रागें भरले, आणि त्याचा वेडेपणा.* थांबविण्याचा (आवर) यत्न केला होता. 17 हे लोक, अशा निर्जल.* विहिरीसारखे.* आहेत ज्या
कोरड्या असतात; असे मेघ, ज्यांना वादळ-वारा उडवून नेत असतो.*, त्यांच्यासाठी अंधकाराचा काळोख.* सर्वदाकरिताचा
आरक्षित आहे. 18 जेव्हा ते व्यर्थ (अर्थहीन) गोष्टी फुगवून फुगवून.* सांगतात, तेव्हां प्रचंड बेशर्मीने देहाच्या इच्छेद्वारे ते त्यांना
फसवितात. होय, असे लोक जे या सगळया दुष्टाई व अनैतिक कृत्यांपासून, स्वतःस वांचवून बाहेर निघालेले आहेत.* नेमके त्याच

---

* *"दिवसाच्या प्रकाशात"*- आपल्या भ्रष्ट अभिलाषा दुष्कृत्यें व व्यभिचार करण्यासाठी, त्यांना रात्र पुरेशी नसते. लाज मुळी नसतेच त्यांना, परिणामी त्यांची अपराधी कृत्यें व दुष्टाई लपविण्याची त्यांना गरजही वाटत नाही आणि ते तसा प्रयत्नही करत नाहीत.

* *"जेवतात"*- प्रेषि 2:42; यहूदा 12. नोट्स 1 करिं 11:20-22.

* **2:14** - हरेक लावण्यवतीकडे ते आकर्षिले जातात व त्यांची दैहिक वासना जागृत होते. मग त्यांची डोकी योजना आखण्यात व्यस्त होतात, तिला कसे सहज गंडवू शकू, किंवा आपल्या पंज्यात अडकवूंन याचा विचार करून ते युक्ति शोधू लागतात. लगातार (सतत) विचारांत, इच्छांमध्ये, कामांद्वारे ते कायम, गुन्ह्यांवर गुन्हें करीत असतात. लोभासाठी अभ्यस्त असलेली मनें बाळगणारे हे दुष्ट लोक, या सर्व अपराधात लिप्त व आनंदी असतात.

* *"लोभाविषयी"*- वचन 3. निव्वळ स्वार्थी व लालची स्वभावाचे असल्यामुळे ते सतत आपलाच विचार करत असतात; त्यांना दुसऱ्यांच्या हिताची पर्वा नसतेच. 1 करिं 16:22; गल 1:8-9; इब्री 6:8; उत्प 4:11; अनु 16:22; गल 1:8-9; उत्प 4:11; अनु 11:26-28; नीति 3:33; यश 24:6.

* *"बलाम"*- यह 11. त्याची माहिती आपण गण अध्याय 22-25 यांत वाचूं शकतो. नोट्स गण 22:1-7,19.खोटे शिक्षक व खोटे संदेष्टे भाड्यावर घेतले जाऊ शकतात. ते पैशामागे धावत सुटतात. दुनियेचे इतर लोभ त्यांना तसेही आकर्षित करत असतातच आणि इतकेच केवळ नव्हे, तर त्यांचा संदेश ऐकणाऱ्या लोकांना जे पाहिजे, लोकांना ज्यामध्ये आनंद व समाधान मिळते तेच हे भाडोत्री बोलतात, लोकांची जशी इच्छा असते त्याच पद्धतीने ते त्यांना शिकवितात.

* **2:15** *"तोच...आहे"*- या लोकांनी सरळ-सच्चा मार्ग सोडून दिला व त्यांनी आता वाईट मार्ग निवडला आहे - 1 योहान 2:19.

* **2:16** - गण 22:28-31.

* *"वेडेपणा"*- परमेश्वरापासून आपण सर्व काही लपवू शकूं असे वाटणे म्हणजे 'शुद्ध-मूर्ख' असणे होय. आपले हेतू, आपली आंतरिक मनीषा आणि लपून ठेवलेली लबाडी, परमेश्वराला कळणारच नाही असे ज्याला वाटते तो 'गाढव-मूर्ख' 'पक्का वेडपट' आहे, त्याचे शहाणपण (फसेवगिरीचे) परमेश्वरापासून कसे लपून राहील? असा वेडेपणा करणारे, परमेश्वराचा मार्ग व त्याची इच्छा त्यागून, त्यांना जसा पाहिजे तोच मार्ग धरण्याचा दृढ-निश्चय करून बसतात, तसेच वागतात देखील.

* *"निर्जल"*- योहान 4:13-14; 7:38-39.

* **2:17** *"निर्जल विहिरीसारखे"*- तुल 2 तीम 3:5.बाहेरून 'मोठे खास-विशेष' दिसतात पण आंतून आतंरिक जीवनाच्या दृष्टिकोनाने, कोरडे - रिकामे व उथळ असतात. आपण परमेश्वराचे आहोत असा ढोल वाजवितात, परंतु खरे पाहिले तर ते 'रिकामी ढोलकी' असे परमेश्वराच्या आत्म्यावांचून (नसलेले) असतात.

* *"मेघ...असतो"*- यहू 12. पाहा - इफि 4:14.

* *"काळोख"*- या पृथ्वीवर ते अंधकाराची निवड करतात - योहान 3:19-20;ते निरंतर (कायमचे) अंधकाराचे आहेत व अंधारातच राहातील - मत्त 8:12; 22:13; यहूदा 13.

* **2:18** *"फुगवून फुगवून"*- अनैतिक कृत्यें करणारे लोकच बहुधा घमेंडखोर असतात - स्तो 52:1; 75:4; 94:4; रोम 1:30; गल 6:13; 2 तीम 3:2; याकोब 3:5.पाहा, ज्यांनी गर्व करायचाच नसतो, तेच लोक अधिक गर्विष्ठ असतात, दुष्ट व नीचाठायी भरपूर घमेंड आढळतो.

* *"वांचवून...आहेत"*- अशा सर्व लोकांवर, जे स्वत:स वांचवून बाहेर आलेले, सुटलेले, सोडविलेले आहेत, ज्यांना येशूवार्ता अधिक जास्त ऐकण्यात व समजून घेण्यात रस वाटतो, त्या नवीन जन्मलेल्या ख्रिस्ती लोकांवर आपला हक्क, अधिकार व ताबा दाखवून पूर्णपणे आपल्या नियंत्रणात आणण्याचा सडेतोड प्रयत्न हे दुष्ट शिक्षक करत असतात, प्रयत्न हाच असतो की त्यांनी देखील त्यांच्यासारखेच भ्रष्ट व्हावे.

लोकांना हे गंडवीत असतात. [19]ते दुसऱ्यांना स्वातंत्र्याचे वचन* देतात, पण स्वतः मात्र गुन्ह्याचे गुलाम* आहेत. पाहा, ज्या एका
गोष्टीने मनुष्य पराभूत (हार) होतो, तीच गोष्ट त्याला गुलामीत खेचून आणते. [20]कारण मुक्तीदाता येशू मशीहांना ओळखल्यानंतर, ते
या दुनियेच्या सडक्या-कुजकेपणापासून राखले (तरले)* गेले आहेत; आणि जर ते पुन्हा त्यांमध्ये फंसत जाऊन त्याने वेढले जातात
तर मग त्यांचा अंत त्यांच्या प्रारंभापेक्षाही आणखी अधिक वाईट व अत्याधिक दयनीय आहे*. [21] *पवित्र आज्ञा* जाणून-समजून
घेतल्यानंतर, तिच्यापासून वळणे यापेक्षा त्यांच्यासाठी हेच बरे असते (होते) की त्यांनी सत्याचा मार्ग ओळखलाच नसता. [22] *परंतु,
ते एका सच्च्या म्हणीप्रमाणेच आहेत: “कुत्रा आपली ओकारी पुन्हा चाटतो व स्वच्छ धुतलेला डुकर पुन्हा चिखलांत जातो (लोळतो).”

## 3

[1]प्रिय मित्रानों, मी तुम्हांला हे दुसरे पत्र लिहितो आहे. मी आठवण* करून देण्यासाठी तुमच्या शुद्ध मनांना उभारी देतो आहे;
[2]जेणेकरून आम्हां प्रेषितांपासून मुक्तीदाता येशूंद्वारे दिली गेलेली आज्ञा* व पवित्र संदेष्टयांद्वारे* पूर्वीपासून दिलेली (सांगिलेल्या)

---

*__2:19__ *“स्वातंत्र्याचे वचन”*- पण त्यांच्या अर्थी हे स्वातंत्र्य म्हणजे, त्यांना जे काही त्यांच्या अपराधमय स्वभावामुळे करावेसे वाटते, त्या सर्व नीच अभिलाषा पूर्ण करणे होय. परमेश्वराच्या कृपेचा ते मोडूनतोडून स्वमर्जीने अर्थ लावतात, आणि तसाच विश्वास सुद्धा बाळगतात की नवजीवन प्राप्त मशीही गुन्हें करतच राहू शकतो आणि तरीपण त्याचा उद्धार कायम असतो. - यहू 4; गल 5:13;ते परमेश्वराचे वचन याविषयी (उद्धार) काय शिकवते याकडे थेट दुर्लक्ष करतात - 1 करिं 6:9-10; गल 5:21,24.

* *“गुलाम”*- योहान 8:34-35; रोम 6:16.पैशांचे गुलाम, भ्रष्टाचार व व्यभिचारी लोक ताठ उभे राहून, मोठ्या दिमाखाने लोकांना आजादीविषयी संदेश देतात. कोणती व कशी आजादी? तर, जसे ते स्वत: अपराधांचे दास झाले आहेत त्याच आजादीचा उपदेश, जी उद्धार-प्राप्त व इतर लोकांना आपला गुलाम करते.

*__2:20__ *“राखले (तरले)”*- असे 'दीड-शहाणे' येशूंविषयी बरेच ज्ञान बाळगतात, यहूदाने काय केले, याची माहिती देखील त्यांना भरपूर असते. पाहा शब्द “जर”आणि तुलना करा इब्री 6:4-6; 10:26-27याची. लोकांना येशूंविषयीचे प्रचंड ज्ञान असू शकते, प्रगाढ व खोल अध्ययन सुद्धा त्यांनी केलेले अंसू शकते. पण तरी, कदाचित या जगाच्या भ्रष्टतेपासून दूर जाऊन तिच्याकडे पाठ दाखवून आपल्या जीवनाचे एक नवीन पृष्ठ सुरु करण्याचा, त्यांनी दृढ-निश्चय देखील केला असेल, पण त्याचा अर्थ असा असणे (होणे) आवश्यक नाहीये, की त्यांनी नवीन आतंरिक जीवन सुद्धा मिळविले आहे व परमेश्वराच्या आत्म्याने दिलेला एक नवा-स्वभाव सुद्धा त्यांच्यात आहे.

* *“मग त्यांचा...आहे”*- तुल मत्त 12:43-45.

*__2:21__ - येशूंचा मार्ग खरा-सत्य व सच्चेपणाचा आहे, एक अगदी सरळ व अरूंद मार्ग - 2:2,15; मत्त 5:20; 7:13-14; यश 35:8; स्तो 15:1-5.हा मार्ग ओळखणे आणि त्यापासून मागे वळणे (त्यागणे), अगदी सहज संभव आहे.

* *“पवित्र आज्ञा”*- मत्त 4:17,19; मार्क 1:15; लूक 24:47; प्रेषि 17:30.मुक्तीवार्तेचा संदेश, जणू काही परमेश्वराच्या नवीन आज्ञेप्रमाणेच आहे.

*__2:22__ - ही पहिली म्हण, नीति 26:11यात आपण वाचूं शकतो, परंतु दुसरी म्हण, कोठे जन्मली, कोठून आली ते मात्र ठाऊक नाहीये. सच्चे-विश्वासीं ‘कोंकरें’ म्हणविली जातात - योहान 10:27,कुत्री किंवा डुकरें नव्हे. कोंकरू आपल्या ओकारीकडे एकतर वळत नाही आणि चिखलात लोळतही नाही. शक्य आहे की येशूंचे विश्वासीं अपराध करू शकतात, अपराधांत - मोहांत पडू शकतात - याकोब 3:2; 1 योहान 2:1; गल 2:11-13; 5:17,परंतु ते त्यांतच पडून राहून लोळत नसतात - नीति 24:16; 1 योहान 3:9.पेत्र येथे एकदम ठळक व स्पष्ट चित्र आपल्यापुढे मांडतो: काही लोक काही एखाद्या-दुसऱ्या कारणास्तव किंवा दुसरे इतर लोक काही काळ धार्मिक होतात, थोडक्या समयासाठी दुष्टाई त्यागतात, अनैतिकतेपासून दूर असतात. पण काही काळ गेल्यावर त्यांचा खरा-सच्चा स्वभाव पुन्हा मूळ धरतो, बाहेर येतो व ते परत त्या जुन्या भ्रष्टाचारात अडकतात; आणि मागे वळतात. स्वच्छ धुतलेले डुकर नेहमी डुकरच राहणार, स्वभावाप्रमाणे ते काही बदलणार नाही, कधीही.

*__3:1__ *“आठवण”*- 1:12-15.

* *“आज्ञा”*- 2:21. विश्वासींचे ज्ञान, समज व त्यांचे आत्मिक जीवन वाढत जाण्यासाठी जुना करार व नवा करार किती किती महत्वाचा व वैशिष्टचपूर्ण आहे त्यावर विशेष भर देऊन येथे पेत्र बजावतो, की विश्वासींनी दोन्ही करार समजून घेणे कां व किती महत्वाचे आहे.

वचनें तुम्ही आठवावीत. 3 सर्व प्रथम तुम्ही ही गोष्ट समजून (जाणून) घ्या, की शेवटल्या दिवसांत थट्टा करणारे[*] त्यांच्या स्वतःच्या
आवडीनिवडींच्या आधारे जीवन जगणारे होतील; 4 आणि असे बोलणारे येतील की येशूंच्या येण्याची[*] प्रतिज्ञा कोठे आहे? कारण
जेव्हापासून आमचे पूर्वज मरण पावले, तेव्हापासून संगळया गोष्टी तशाच आहेत जशा दुनियेच्या प्रारंभापासूनच्या आहेत?
5 जाणूनबुजून[*] ते हा सच्चेपणा (सत्य) नाकारतील (नकार देतील), की आकाशाची बहुत पूर्वी रचनाकाराच्या शब्दाने[*](म्हटल्यावर)
झाली होती, हे देखील की जमीन जलांतून निघाली व जलांतच स्थिर आहे. 6 [*]त्या समयाची दुनिया पाण्याने झांकली गेली होती व
तिचा विनाश झाला होता, 7 परंतु त्याच (परमेश्वराच्या) वचनाने[*], वर्तमानातील आकाश व जमीन, अग्नीने[*] नाश (बर्बाद)
करण्यासाठी राखलेली आहेत; अर्थात जोवर न्यायाचा दिवस व दुष्ट लोकांच्या विनाशाचा समय येत नाही तोवर. 8 [*]पण प्रिय
बंधुभगिनींनों, या गोष्टीविषयी अजाण राहू (असू) नका, की येशूंकरिता एक दिवस हजार वर्षांसारखा आहे व हजार वर्षे, एका
दिवसासारखी आहेत. 9 जसे काही लोक समजतात तसा परमेश्वर आपल्या प्रतिज्ञा पूर्ण करण्यांत धिमा नाहीये, . परंतु तो आम्हां
सर्वांसाठी धीर बाळगणारा आहे, कारण कोणत्याही मनुष्याचा नाश होऊ नये[*] अशी त्याची इच्छा आहे, आणि सर्वांचे मनपरिवर्तन[*]
व्हावे हे देखील त्याला हवेच आहे. 10 तरीपण परमेश्वराचा दिवस[*], रात्री गुपचुपपणे येणाऱ्या चोराच्या येण्यासारखा असेल[*]. त्या

---

[*]**3:2** *"संदेष्टचांद्वारे"*- 1:19-21.

[*]**3:3** *"थट्टा करणारे"*- 2:12; 2 इति 36:16; स्तो 1:1; 73:8; 74:22; नीति 14:9; 15:12; 19:29; 21:24; यश 28:4; प्रेषि 13:41; यहूदा 18. काही लोक 'व्यवस्थित व सबळ पाया असणाऱ्या' ख्रिस्ती लोकांच्या विश्वासाची टिंगल करतात, त्यांच्या ठोस व भक्कम विश्वासाची थट्टा करणारे या दुनियेत होते, आहेत व राहातील. हे थट्टाखोर, प्रमाणांची पारख करण्याचे टाळतात, त्याऐवजी त्यांना थट्टा करणे सोपे वाटते; आपली दुष्टाई व वाईट अभिलाषा त्यागण्याचा विचार देखील त्यांना स्पर्श करत नाही.

[*]**3:4** *"येशूंच्या येण्याची"*- मत्त 24:3,30; योहान 14:3.या थट्टेबाजांचे मत असते व ते गृहित धरितात की येशू अद्याप आले नाहीतच, तेच ऐकून ऐकून बराच काळ लोटला म्हणून आता येशू पुन्हा (परत) कधी येणार नाहीतच मुळी.

[*]**3:5** *"जाणूनबुजून"*- आपल्या दुष्ट इच्छा कायम (चालूच) ठेवण्याची इच्छा धरून ते तसेच वागत असतात, आणि त्यांची वाईट इच्छा पूर्ण करण्यामध्ये, जे जे आडवे येत असेल त्याकडे तर ते दुर्लक्ष करतातच परंतु त्याविषयी ध्यानीमनी विचार करणेही त्यांना नको असते. त्यांची मतें, त्यांचा विचार वास्तविकतेवर आधारलेला नसतो, पण 'जे त्यांना करावयास हवे"त्या गोष्टींवर आधारलेला असतो. तुल रोम 1:28.त्यांनी परमेश्वराचे सत्य व अविश्वास यांच्याकडे केलेले दुर्लक्ष, हे त्यांनी मुद्दामून-जाणूनबुजून व बंडाळी करण्याच्या हेतूने केलेले कार्य असते.

[*]*"रचनाकाराच्या शब्दाने"*- उत्प 1:1-3,6,9; स्तो 33:6.

[*]**3:6** - पाहा 2:5.

[*]**3:7** *"वचनाने"*- इब्री 1:3.

[*]*"अग्नीने"*- वचन 12. यश 66:15-16; नहूम 1:6; मलाखी 4:1; प्रकटी 20:9.अग्नी, आकाश व पृथ्वी केव्हा नाश करेल? पाहा, अविश्वासींचा न्याय होईल नेमक्या त्या समयी, त्यापूर्वी (आधी) नाहीच - पाहा, प्रकटी 20:11-15.तुल मत्त 19:28; प्रेषि 3:21; रोम 8:19-21.

[*]**3:8-9** - येशूंनी परत पृथ्वीवरच्या, त्यांच्या द्वितीय आगमनाची जी प्रतिज्ञा केली होती, तिला दीर्घ काळ (खूप समय) लोटला आहे, असे लोकांना वाटते. परंतु, आपण जशी काळ-समयाची गणना करतो, तशी परमेश्वर करत नसतो. त्याला (त्यासाठी) हा लंब कालखंड दोन दिवसांसारखा किंवा त्याहून कमी असू शकतो. पाहा स्तो 90:4व नोट्स. जर परमेश्वर 2000 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वर्षे येशूंना पुन्हा या जगात पाठविण्यासाठी वाट पाहात असेल किंवा थांबलेला असेल, तर खात्रीने व निश्चितच त्यामध्ये परमेश्वराच्या मनांत एक सर्वोत्तम हेतू असेलच (यात शंकाच नाही). या समयी परमेश्वर मनुष्यांना पश्चात्तापाच्या वळणापर्यंत आणण्याच्या कार्यात व्यस्त आहे तोवर, जोवर त्याला अशी शाश्वती होत नाही, की यापुढे थांबण्याची गरज नाही व आत्ता तो योग्य समय येऊन ठेपलाच आहे. मुक्तीचे हे कार्य परमेश्वराच्या योजनेनुसार जोपर्यंत पूर्णत्वास जाणार नाही, तोपर्यंत तो येशूंना द्वितीय आगमनासाठी पुन्हा या पृथ्वीवर पाठविणार नाही. तुल उत्प 6:3.

[*]**3:9** *"कोणत्याही...नये"*- यहे 18:32; 1 तीम 2:4; योहान 3:16.प्रत्येक मनुष्याने अपराधांच्या पश्चात्तापापर्यंत यावे व त्याची मुक्ति व्हावी; अनंत काळासाठी त्याचा नाश होऊं नये, हीच परमेश्वराची कळकळीची इच्छा आहे - प्रेषि 17:30.

[*]*"मनपरिवर्तन"*- अर्थात पश्चात्ताप - मत्त 3:2.

[*]**3:10** *"परमेश्वराचा दिवस"*- नोट्स - यश 2:12; 13:6-13; योएल 2:1-2,30,31; सफन्या 1:14-18; प्रेषि 2:20; 1 थेस्स 5:2; 2 थेस्स 2:2.बायबलमधील 'दिवस' हा शब्द शब्दश: एक दिवस असा अर्थ असणे आवश्यक नाहीये. पाहा उत्प 2:4; योहान 9:4; यश 34:8; 1 थेस्स 5:5,8.'उद्धाराचा दिवस' - 2 करिं 6:2हा पौलाच्या दिवसांतही चालू होता व तो थेट आपल्या दिवसांपर्यंतही लगातार

दिवशी आकाश एका बुलंद आवाजासह नाहीतसे (गायब) होईल, आणि प्रचंड उष्णतेसह (ने)* सर्व सर्व वस्तु वितळून जातील. दुनिया व तिच्यावरची सर्व कृत्यें जळून भस्म होतील. [11] *जर या सर्व वस्तुं अशा रीतिने वितळणार आहेत तर चालचलणुकीत व सच्च्या जीवनात*, तुम्ही कसे (प्रकारचे) लोक असावयास हवे? [12] ज्या दिवशी आकाश व त्याचे सर्व तारे जळून नष्ट होतील, प्रभूच्या त्याच दिवसाची* व येशूंच्या शीघ्र आगमनाची वाट तुम्ही पाहात आहा; [13] परंतु आपण त्याच्या प्रतिज्ञांनुसार एक नवे आकाश व नव्या पृथ्वीची प्रतिक्षा करत आहोत*, जेथे केवळ प्रामाणिकपणा, सच्चेपणा, न्याय व नैतिकताच (नीतिमत्व) वास करेल*. [14] *प्रिय मित्रहो, जेव्हा या सर्व गोष्टींच्या प्रतिक्षेत तुम्ही आहा, तर प्रयत्न करा की तुम्ही आपसांत मेळभाव (सौख्य) राखून व बेदाग आणि निर्दोष अवस्थेत आहा असे आढळावे. [15] हे सुद्धा जाणून घ्या की आपल्या प्रभुचा धीरच* आपल्यासाठी भलेपणाची कृत्यें साधणारा व सुरक्षेचा आहे, अगदी जसे आमचा प्रिय भाऊ पौल*ाने त्याला मिळालेल्या (दिलेल्या) ज्ञानाच्या आधारे तुम्हांस लिहिलेले आहे. [16] त्याच्या सर्व पत्रांत या सर्व गोष्टी लिहिलेल्या आहेत पण तरी, त्यांतील काही गोष्टी समजावयास कठीण* आहेत.

---

चालू आहेच, हा ‘दिवस’ सुमारे 2000 वर्षांपर्यंतही कायम पुढे जातोच आहे. एका दिवसाचे तास ‘प्रभुसाठी’ एक हजार वर्षांचा ‘कालखंड’ किंवा त्यांहून अधिक असू शकतो, त्या ‘एका दिवसाचा’ प्रारंभ येशूंच्या द्वितीय आगमनाने चालू होईल, तो थेट परमेश्वराच्या शेवटल्या न्यायाच्या दिवसापर्यंत, ज्याविषयी आपण प्रकटी 20:11-15यांत वाचतो.

*“*रात्री...असेल*”- 1 थेस्स 5:1-3; प्रकटी 3:3; 16:15.

*“*प्रचंड उष्णतेसह (ने)*”- वचन 7. पेत्र आपल्याला भविष्यातील - घडणाऱ्या घटनाक्रमांची एखादी चौकट (फ्रेम) किंवा आखलेल्या रूपरेषेविषयी बोलत नाहीये. त्याची भाषा देखील ही संभावना (शक्यता) नाकारीत नाही, की शेवटला न्याय व आकाश-जमीन ही नाश केली जाण्यापूर्वी येशू एक हजार वर्षे शासन करतील व त्यानंतरच भयंकर दंड येईल - प्रकटी 20:1-6.प्रचंड महाभयानक दंड आधीही व त्या एक हजार वर्षांनंतरही येणार - 2 थेस्स 1:7; यश 24:6-13; 29:6; 30:30; प्रकटी 16:8-9; 20:9,14,15.

***3:11** “*कसे...असावयास हवे?*”- जी दुनिया, जे जग संपूर्णत: नष्टतेच्या प्रवासाची वाटचाल करीत पुढे आत आहे, त्यांत दुनियादारीच्या व जगिक गोष्टींच्या मागे वेड्यासारखे धावत राहून, जीवन जगणे हे शहाणपणाचे वर्तन आहे काय? समजदारीची चाल आहे काय? तुल 1 योहान 2:15-17.

*“*सच्च्या जीवनात*”- तीताला 2:11-14; 1 पेत्र 1:15; 1 योहान 1:6.

***3:12** “*प्रभूच्या...दिवसाची*”- वचन 10; 1 करिं 1:8; 3:13; 5:5; 2 करिं 1:14; फिलि 1:6;विश्वासी तो दिवस अतिशय शीघ्रतेने कसा काय आणू शकतो? म्हणजे, तो दिवस खूप लवकर जवळ यावा म्हणून आपण सर्व काय करू शकतो? प्रभू येशूंनी विश्वासींना अर्थात आपण सर्वांना जे करावयांस सांगितले होते, तेच करून (द्वारे). त्यांनी आपल्याला प्रार्थना करण्याचा स्पष्ट निर्देश व सरळआज्ञाच दिलेली आहे, कशासाठी? त्यांचे राज्य लवकरांत लवकर जवळ यावे यासाठी - मत्त 6:10,आणि त्याचबरोबर त्याची येशूवार्ता (संदेश) पृथ्वीवर आढळणाऱ्या व सर्व ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या भिन्नभिन्न प्रकारच्या लोकांपर्यंत पोचवण्याचे (ऐकविण्याचे) कार्य (सेवा) देखील सोपलेले आहे - मत्त 28:19; मार्क 16:13.ज्या दिवशी (जेव्हा) चर्चला दिलेले हे 'विशेष कार्य'संपूर्णपणे संपुष्टात येईल त्याच विशिष्ट क्षणी या युगाचा अंत जवळ येईल - मत्त 24:14.

***3:13** “*नवे आकाश... करत आहोत*”- यश 65:17; प्रकटी 21:1.

*“*जेथे...वास करेल*”- प्रकटी 21:27; 22:14-15; स्तो 15:1-5; 89:14; 118:19; यश 11:4-5; 1 करिं 6:9-10.या दुनियेच्या अगदी विरुद्ध असे हे स्थान असेल. या दुनियेत, लोक प्रामाणिकपणे जगलेले जीवन व सच्चेपणाची वागणूक आणि परमेश्वरी नीतीमत्व पालन करणाऱ्यांना तुच्छ ठरवितात. सरळ, सात्विक व परमेश्वराचे भय बाळगून जगणाऱ्याला, या दुनियेत तुच्छ गणिले जाते, पदोपदी अपमानित केले जाते, नव्हे त्याकरता त्याला छळिले जाते, दंड दिला जातो. निराश होतां कामा नये विश्वासींनो, कारण नवे आकाश व नवी पृथ्वी देखील केवळ प्रामाणिकपणा, सच्चेपणा, न्याय व नैतिकतेनेच परिपूर्ण असेल.

***3:14** - दानी 12:10; 1 करिं 1:8; इफि 1:4; 4:3; 5:27; फिलि 1:10; 2:15; 1 थेस्स 5:23; इब्री 12:14.येशूंच्या आदेश-निर्देशानुसार जर आपण जीवन जगत असूं, तर त्यांच्या द्वितीय आगमनाची (येणे) वाट मोठ्या आत्मविश्वासाने, आनंदाने व उत्साहाने पाहू शकू (असू).

***3:15** “*धीरच*”- वचन 9.

*“*पौल*”- आपल्या प्रभूचा धीर आपली सुरक्षा व आपले कल्याण करतो. परमेश्वराने आपल्याला जो धीर व संयम दिला आहे त्याविषयी पेत्र येथे बोलतो. त्याला मिळालेल्या ज्ञानाच्या जसे पौलाने आधारे, सर्व विश्वासींना लिहून कळवले होते, त्याविषयीचा कदाचित उल्लेख पेत्र येथे करत आहे असे वाटते - रोम 2:4; 3:25-26; 9:22-23; 10:21.

***3:16**“*समजावयास कठीण*”- पौलाच्या काही पत्रांत कठीण गोष्टी व कठीण भाषा आढळते, उदा. रोमकरांसचा काहीसा भाग.

जे लोक अज्ञानी (न समजून घेणारे) व डळमळणारे[*] असतात, ते या गोष्टींची मोडतोड अशी करितात, जशी ते बायबलच्या पवित्र
वचनांची[*] मोडतोड[*] स्वतःच्याच हानिसाठी[*][*] करत असतात. 17 हे भाऊबहिणींनों, तुम्ही पूर्वीपासूनच (आधीच) या सर्व गोष्टी नीट
जाणता व तुम्हांला त्या कळल्याही आहेत. या कारणास्तव सावध[*] असा, की दुष्टाच्या दुष्टाईमुळे[*] तुम्ही मार्ग चुकून (दिशाभूल)
सच्चेपणापासून इकडेतिकडे सरकता-भटकता (ढळता) कामा नये[*]. 18 परंतु तुम्ही आपले उद्धारकर्ता येशू मशीहांच्या असीम कृपेंत[*]
व त्यांची ओळख अधिक गांभिर्याने होत जाणाऱ्या ज्ञानांत[*] वाढत जा[*]. त्यांचाच महिमा आतापासून-सदाकाळापर्यंत होत राहो.
होय, असेच व्हावे[*].

---

साधारण मनुष्यास ते समजून घेणे अवघड होते. जोवर भरपूर व प्रगाढ अध्ययन (अभ्यास) नाहीये, व सर्वांत जास्त म्हणजे परमेश्वराचा आत्मा जोवर ज्ञान, समज व प्रकाशन देत नाही तोवर, आपण ते जास्त नीटसे समजू शकणार नाही.

[*] *“डळमळणारे”*- पाहा ‘अज्ञानी’ या शब्दापेक्षा, ‘डळमळणारे’ हा शब्द -अनुवाद बिलकुल सटीक व समर्पक वाटतो, पाहा, अज्ञान किंवा शिक्षण ही दोन्हीं लोकांना डळमळीत किंवा वचनांची तोडमोड करून ती आपल्या मनमर्जीनुरूप वाकविण्याचा प्रयत्न करत नाही. परंतु परमेश्वराविषयीचा अजाणपणा व परमेश्वराच्या वचनांचा अभ्यास (अध्ययन) कसा करावा, वचन कशा प्रकारे समजून घ्यावे याविषयीचे अज्ञान मात्र लोकांना आपल्या सुविधेप्रमाणे वचनाची मोडतोड करावयास भाग पाडते.

[*] *“पवित्र वचनांची”*- लक्ष द्या, पौलाने त्याच्या पत्रात लिहिलेल्या बाबींना पेत्र, परमेश्वरी वचनांचा दर्जा देतो आहे. बायबलच्या इतर वचनांकडे लक्ष वेधून तो म्हणतो की पौलाची पत्रें परमेश्वर-प्रेरित आहेत. पेत्राने ही गोष्ट मान्य केली व स्वीकारली की पौलाने जे काही या पत्रांत लिहिले ते सर्व त्याने पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने लिहिले - 1:20-21.

[*] *“मोडतोड”*- प्रेषि 20:30; 2 करिं 4:2; गल 1:7; यिर्म 23:36.कशा रीतिने पौल व बायबलच्या अन्य लेखकांनी लिहिलेल्या बाबींशी, लोकांनी मोडतोडीचा खेळ चालविला आहे. त्यांत स्वत:ला मोठे विद्वान, पंडित व उच्च शिक्षण असण्याचा दावा करणारे लोक देखील सहभागी आहेतच. परमेश्वराचे वचन या लोकांच्या हातचे खेळणे झाले जणू, व त्यामुळे बायबल समजून न घेण्याचे नुकसान लोक आजही सहन करत आहेत.

[*] *“ते...हानिसाठी”*- 2:1,3; 2 थेस्स 2:10.आपण अत्यंत सावध असावे; परमेश्वराच्या प्रकाशनांशी आपण कसा व्यवहार करतो, त्याचा कसा अर्थ लावतो, त्याचे काय करतो याविषयी जपा विश्वासींनों. आपल्याला काय साध्य करावयाचे आहे किंवा आपली काय इच्छा आहे यांस अनुसरून जर आपण येशूंच्या शिकवणींची मोडतोड केली, आपल्या फायद्यासाठी तिचा अर्थ बदलला, आपली बुद्धि फिरवून अयोग्य अर्थ लाविला तर आपण परमेश्वराच्या दंडापासून वाचूं शकणार नाही व त्याचे दोषी ठरुं.

[*] *“हानिसाठी”*- 2:14; याकोब 1:8.सत्याठायी ते ठाम नसतातच मुळी - कल 1:23; 4:12; 1 थेस्स 3:8; 2 थेस्स 2:15; 1 पेत्र 5:9-10.

[*] **3:17** *“सावध”*- अथवा जागृत असा - मत्त 10:17; 16:6; मार्क 13:9,23,33; प्रेषि 20:31; 1 करिं 16:13.

[*] *“दुष्टाईमुळे”*- किंवा नियंत्रणांविना - 2:7-8; 2 थेस्स 2:3,7-9; 1 योहान 3:4; यहूदा 1:4. 1 करिं 9:21; याकोब 2:8.

[*] *“सरकता...नये”*- 1:10; 1 करिं 10:12.

[*] *“कृपेंत”*- तीताला 2:11-14यामध्ये पाहा की कृपा आपणास काय शिकविते व आपण कोणत्या बाबतीत वाढत जावे ! प्रभू येशूंची कृपा: जर आपण त्या येशूकृपेंठायी वाढत गेलो तर त्याचा अर्थ, आपण येशूंसारखे अधिकाधिक होत जाऊ.

[*] *“ज्ञानांत”*- इफि 1:17; 3:18-19; फिलि 3:10; कल 1:9; 2:2.येशूंना जास्तीत जास्त ओळखीत जाणे व विपुल प्रमाणात 'त्यांच्याचसारखे होत जाणे' हा प्रत्येक विश्वासीचा महान हेतू असावा.

[*] **3:18** *“वाढत जा”*- इफि 4:12-15; 1 पेत्र 2:2.

[*] *“त्यांचाच...व्हावे”*- पेत्राला ठाम विश्वास आहे की महिमेचा दावेदार व हक्कदार केवळ ख्रिस्तच आहेत, महिमा (गौरव) निव्वळ त्यांचाच आहे, फक्त परमेश्वरच या 'गौरवायोग्य आहे' - यश 42:8; रोम 11:36; 16:27.येशू ख्रिस्तच फक्त महिमेयोग्य आहेत, कारण येशू मशीहा देहधारी परमेश्वर आहे.